LOKMAT (Marathi) Date: 01-02-2020 (page 11)

लोकमत

# 'स्वच्छतेमुळे विकासकार्याला गती'

लोकमत न्यूज नेटवर्क




व्यासपीठावरील मान्यवरांसोबत राज्यपातळीवर विजेते ठरलेला विद्यार्थी वर्ग.

**खोतीगाव :** आपले घर जसे स्वच्छ ठेवतो तसेच आपण आपली शाळा व परिसर स्वच्छ ठेवणे महत्त्वाचे आह. या बाह्य स्वच्छतेबरोबर प्रत्येकाने विविध वृत्तपत्रे, मासिके, नियतकालीके, पाक्षिके वाचन केल्यास त्यातून मानसिक व बौद्धिक विचारांची स्वच्छता होऊन विकासकार्याला गती मिळते, असे प्रतिपादन कुंकळ्ळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय देसाई यांनी केले.

उच्च माध्यमिक विद्यालय माशे-काणकोण येथील विद्यार्थ्यांच्या बक्षीस वितरण समारंभावेळी प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष प्रशांत नाईक यांनीही विचार मांडले

सत्यवती सोयरु उच्च माध्यमिक विद्यालयाने विद्यार्थी विकासासाठी केलेल्या कामगिरीचा आढावा कार्यकारी प्राचार्य जयराम गावकर यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकावेळी घेतला. या वेळी विद्यालयाचे माजी विद्यार्थी अपेक्षा नाडकर्णी व हर्षदा प्रभुदेसाई यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षक कविंद्र फळदेसाई अणि सुदिर पै यांनी वर्षाचा अहवाल दृक-श्राव्य माध्यमातून सादर केला.

शिक्षक अ‍ॅन्थनी बारेटो, गिरीजा पेडणेकर आणि अंकिता नाईक यांनी कार्यक्रमाची सर्व सूत्रे सांभाळली तर स्नेहर्ष पागी यांनी आभार व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर व्यवस्थापन मंडळाचे प्रमुख उर्मीला लोलयेकरही उपस्थित होत्या. विद्यालयातील राज्यपातळीवरील विविध स्पर्धात विजेते ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानही या वेळी करण्यात आला.

Goa Main
Page No. 11 Feb 01, 2020
Powered by: erelego.com

GOAN VARTA (Marathi) Page 05



५ ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेचे लक्ष्य समोर ठेवून सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पातून जनतेला खूष करण्यास अर्थमंत्री अपयशी ठरल्या आहेत. गेल्या ७ वर्षांच्या तुलनेत यंदा वेगळा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे, परंतु प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे. करप्रणालीत बदल करण्यात आले असले तरी ते सशर्त आहेत. यामुळे बहुतांश करदाते पूर्वीचाच पर्याय निवडण्याची शक्यता आहे.

**—डॉ. संजय सावंत देसाई**, प्राचार्य, सीईएस महाविद्यालय, कुंकळ्ळी

गोवन वार्ता
Sun, 02 February 2020
epaper.thegoan.net/c/48574645

GOAN VARTA (Marathi) Page 05



देशात शेती अधांतरी आहे. शेतकरी कर्जमुक्तीसाठी अर्थसंकल्पात ठोस कृती नाही. शेतकऱ्यांच्या मालाला चांगला दर मिळून उत्पादन खर्च, उदरनिर्वाह योग्य पद्धतीने होईल, याची आखणी कुठेच नाही.

**—अविनाश रायकर**, सहाय्यक प्राध्यापक, सीईएस कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुंकळ्ळी-गोवा

Gomantak (Marathi) 02-02-2020 (page 05)



माशे : सत्यवती सोयरू उच्च माध्यमिक विद्यालयाच्या बक्षीस वितरण समारंभात प्रमुख पाहुणे डॉ. संजय देसाई यांच्यासह मान्यवर व राज्य पातळीवर विजेते ठरलेले यशस्वी विद्यार्थी. (निराकार)

# वाचनामुळे मानसिक, बौद्धिक विकास : डॉ. संजय देसाई

**आगोंद,** ता. १ (प्रतिनिधी) : बाह्य स्वच्छते बरोबरच प्रत्येकाने मासिके, वृत्तपत्रे, नियतकालिके व अन्य साहित्याचे वाचन केले तर मानसिक व बौद्धिक विकास होतो. त्यामधून जीवनात तेज निर्माण होऊन विकास कार्याला गती मिळते. आपल्या घराप्रमाणेच शाळा व आपला परिसर स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे, असे विचार कुंकळ्ळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय देसाई यांनी व्यक्त केले.

माशे, काणकोण येथील उच्च माध्यमिक विद्यालयाच्या बक्षीस वितरण समारंभ कार्यक्रमात डॉ. देसाई प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करीत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यकारी प्राचार्य जयराम गावकर, संस्थेचे अध्यक्ष प्रशांत नाईक, अनंतराव सावकार, ऊर्मिला लोलयेकर आदी उपस्थित होते.

आपण कोणत्याही गोष्टीकडे एकाग्रतेने, ध्येयाने कार्यरत राहिल्यास यश हमखास मिळते. देशातील पाच प्रेरणास्रोत असलेल्या विद्यार्थ्यांच्या घटनांची यादी निराकार संस्थेचे अध्यक्ष प्रशांत नाईक यांनी यावेळी विद्यार्थ्यांना सांगितली.

सत्यवती सोयरू उच्च माध्यमिक विद्यालयाने सुरवातीपासून आजपर्यंत विद्यार्थ्यांच्या सर्वांगाने सुप्त कलागुणांना कसा वाव दिला आणि विद्यार्थी विकासासाठी केलेल्या कामगिरीचा आढावा सध्याचे कार्यकारी प्राचार्य जयराम गावकर यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकपर भाषणात घेतला. यावेळी विद्यालयाच्या माजी विद्यार्थी अपेक्षा नाडकर्णी व हर्षदा प्रभुदेसाई यांनी आपल्या अनुभवातून काही धाडसी आणि प्रेरणार्थक अशा आठवणी सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

राज्य पातळीवर विविध स्पर्धांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. शिक्षक कविंद्र फळदेसाई आणि सुधिर पै यांनी वार्षिक अहवाल दृक्-श्राव्य माध्यमातून सादर केला. शिक्षक अँथनी बार्रेटो, गिरीजा पेडणेकर आणि अंकिता नाईक यांनी कार्यक्रमाची सूत्रे सांभाळली. तर स्नेहर्ष पागी यांनी आभार मानले.

Gomantak (Marathi) 02-02-2020 (page 03)

# करदात्यांना मोठ्या अपेक्षा



अलीकडेच सरकारने उद्योग करात १० टक्के कपात केल्याने अर्थमंत्र्यांकडून या खेपेस करदात्यांच्या मोठ्या अपेक्षा आहेत. उद्योग करांच्या धर्तीवर आयकराच्या स्लॅब दरात कपात होईल, अशी वैयक्तिक करदात्यांची अपेक्षा आहे. पण, जीएसटीद्वारे महिना १ लाख कोटींचा महसूल गोळा करण्यास सरकारला यातायात करावी लागत आहे. ही स्थिती पाहिल्यास वैयक्तिक करदात्यांचा अपेक्षाभंग होण्याची शक्यता आहे. दुसरे म्हणजे अर्थव्यवस्थेचा आलेख खाली जात आहे. सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा (जीडीपी) दर ५ पेक्षाही खाली दाखवण्यात येत आहे. जीडीपीत वाढ करण्यासाठी सरकारला खर्च जादा करावा लागेल. पण, महसुलात होणारी घट पाहता अर्थमंत्र्यांना लोकप्रिय अर्थसंकल्प मांडणे कठीण जाईल असे दिसते.

**– संजय सावंत देसाई, प्राचार्य, सीईएस महाविद्यालय, कुंकळ्ळी.**

Gomantak (Marathi) 02-02-2020 (page 04)

# शेतकऱ्यांची निराशा

मरगळलेल्या कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी ग्रामीण जनतेच्या हातात पैसा खेळेल अशा योजना अर्थमंत्री अर्थसंकल्पात जाहीर करतील अशी अपेक्षा होती. २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट या घोषणेचा अर्थसंकल्पात पुनरुच्चार करण्यात आला असला तरी हे उद्दीष्ट गाठण्यासाठी निश्‍चित असे दिशादर्शन करण्यात आलेले नाही. कृषी पतमध्ये वाढ करण्यात आली असली तरी शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळण्याबाबत शंका आहे. कर्जबाजारी झालेला शेतकरी पुन्हा कर्ज घेण्यासाठी आधीच अपात्र ठरलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून मुक्त करण्यास हा अर्थसंकल्प अपयशी ठरला आहे. गोव्याचा विचार केल्यास अर्थसंकल्पात 'सागर मित्रा' ही मच्छिमार बांधवांसाठी योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेत मच्छिमार क्षेत्रात सहकारास प्रोत्साहन देण्यात येणार आहे. एकंदर अर्थसंकल्पात शेतीसाठी मोठी स्वप्ने दाखवण्यात आली आहेत खरी. पण, शेतकऱ्यांच्या हाती ठोस असे काही लागलेले नाही.

**- अविनाश रायकर,**

सहयोगी प्राध्यापक, सीईएस महाविद्यालय

GOMANTAK (page no. 11) Date; 07 Febraury 2020

गोमन्तक

# दूरदृष्टी ठेवून मांडलेला अर्थसंकल्प



**जीडीपीचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट**

आकडेवारी पाहिल्यास हा अर्थसंकल्प छान वाटतो, पण आकडेवारीतून निश्‍चित केलेले उद्दिष्ट महत्वाकांक्षी आहे. यंदाचा अर्थसंकल्प २१ हजार ५६ कोटी खर्चाचा आहे. मागच्या वर्षाच्या तुलनेत (१९५४८ कोटी) या अर्थसंकल्पात ७ टक्के वाढ अपेक्षीत आहे. दुसऱ्या बाजुला राज्य सकल उत्पादन (एसजीडीपी) ९२ हजार कोटी आहे. पुढील वर्षी ९ टक्के वाढीच्या अपेक्षेने १ लाख कोटी जीडीपीचे उद्दिष्ट मुख्यमंत्र्यांनी ठेवले आहे. अर्थसंकल्पीय खर्चात ७ टक्के वाढ अपेक्षीत असताना जीडीपीत ९ टक्के वाढीची अपेक्षा मख्यमंत्र्यांनी केली आहे. हे गणित जुळत नाही. जीडीपीत अशी वाढ करायची झाल्यास प्रशासनाची कार्यक्षमता वाढवावी लागेल. सरकारी खात्यात फाईल्स अडकून पडल्यास जनतेची कामे रेंगाळतात व त्यामुळे जनतेकडून खर्च कमी होतो. अर्थव्यवस्थेच्या वाढीस अशी स्थिती पोषक असत नाही. त्यामुळे कार्यक्षमतेत पराकोटीची वाढ झाली तरच १ लाख कोटीच्या जीडीपीचे उद्दिष्ट गाठण्याचा चमत्कार शक्य आहे. अर्थसंकल्पातील दाखवलेल्या एकूण २१०५६ कोटी खर्चापैकी ७५ टक्के महसुली व २५ टक्के भांडवली खर्चासाठी तरतूद करण्यात आली आहे. सरकारी तिजोरीतील ३७ टक्के निधी वेतनावर, २८ टक्के विकासकामे, १२ टक्के कर्जावर खर्च करण्यात येणार आहे. सरकारी तिजोरीत ५० टक्के महसूल विक्री कराच्या रुपात, २० टक्के केंद्रीय कर, १५ टक्के केंद्र सरकारकडून सहाय्य व १५ टक्के कर्जाच्या रुपात येणार आहे. कर्जाची आकडेवारी पाहिल्यास पुढील वर्षी सरकारला सुमारे ३ हजार कोटींचे कर्ज घ्यावे लागेल.

– **संजय सावंत देसाई** (प्राचार्य, सीईएस महाविद्यालय, कुंकळ्ळी).

GoanVarta (Marathi) Date:18-02-2020 (page 05)

# APPOINTMENT

## THE C.E.S. COLLEGE OF ARTS AND COMMERCE

**CUNCOLIM, SALCETE-GOA 403 703**

(Affiliated to Goa University)

**email** :cuncolimcollege@gmail.com **website** www.cescollege.ac.in

## WALK IN INTERVIEW/SKILL BASED TEST

Applications stating full name and address, email id, contact number, age, self attested copies of educational qualifications, experience, residence certificate for 15 years, computer literacy certificate, employment exchange registration card etc., are invited from Indian Nationals for the following post on **24.02.2020 at 9.30 a.m.**

### For the post of LDC (CCL) on Contract basis for 92 days

For the above post, knowledge of Konkani essential and Marathi is desirable. Scale of Pay and other service conditions are as prescribed by Government of Goa.

Date : 17.02.2020
Place : Cuncolim Goa

**Dr. Sanjay P. Sawant Dessai**
**Principal**

Tue, 18 February 2020
epaper.thegoan.net/c/49116214

The Goan (English) Date 18-02-2020 (page 05)

**APPOINTMENT**

# THE C.E.S. COLLEGE OF ARTS AND COMMERCE

**CUNCOLIM, SALCETE-GOA 403 703**

(Affiliated to Goa University)

**email** :cuncolimcollege@gmail.com **website** www.cescollege.ac.in

## WALK IN INTERVIEW/SKILL BASED TEST

Applications stating full name and address, email id, contact number, age, self attested copies of educational qualifications, experience, residence certificate for 15 years, computer literacy certificate, employment exchange registration card etc., are invited from Indian Nationals for the following post on **24.02.2020 at 9.30 a.m.**

**For the post of LDC (CCL) on Contract basis for 92 days**

For the above post, knowledge of Konkani essential and Marathi is desirable. Scale of Pay and other service conditions are as prescribed by Government of Goa.

Date : 17.02.2020
Place : Cuncolim Goa

**Dr. Sanjay P. Sawant Dessai**
**Principal**

THE GOAN EVERYDAY Tue, 18 February 2020 epaper.thegoan.net/c/491

GOAN VARTA (Marathi) Date:19-02-2020 (page 05)

# APPOINTMENT

CUNCOLIM, SALCETE-GOA 403 703
Ph.No.08322865210

## OUTSOURCING OF SERVICES

Quotations are invited from individuals on daily wages payment basis for outsourcing the following services at CES College of Arts and Commerce as per the requirements enlisted against each of the services.

| Sr. No | Services to be outsourced | Job requirement | Qualification/Experience |
|---|---|---|---|
| 1. | 01 Watchman | To work in shifts, patrolling property, monitoring surveillance and control access at Institute entrances and vehicle gates. | Literate with knowledge of Konkani language. Persons with experience will be preferred. |
| 2. | 01 Sweeper | cleaning activities such as sweeping, mopping, dusting polishing in classrooms, toilets, washrooms, offices and common rooms etc | Knowledge of Konkani language. Literate with proven experience as a cleaner or housekeeper. People residing in the vicinity of the college will be preferred. |

Quotations should specify the wage rate payable per day. It should also include experience and qualification alongwith the area of speciality.

The quotation for outsourcing the above services, addressed to the Principal, CES College of Arts and Commerce, Cuncolim-Salcete-Goa 403 703, should reach by 27.2.2020 before 2.00 p.m.

Date :18.02.2020 Dr. Sanjay P. Sawant Dessai

Place : Cuncolim-Goa Principal

Wed, 19 February 2020
epaper.thegoan.net/c/49151326

THE GOAN (English) Date 19-02-2020 (page 05)

# APPOINTMENT

CUNCOLIM, SALCETE-GOA 403 703
Ph.No.08322865210

## OUTSOURCING OF SERVICES

Quotations are invited from individuals on daily wages payment basis for outsourcing the following services at CES College of Arts and Commerce as per the requirements enlisted against each of the services.

| Sr. No | Services to be outsourced | Job requirement | Qualification/Experience |
|---|---|---|---|
| 1. | 01 Watchman | To work in shifts, patrolling property, monitoring surveillance and control access at Institute entrances and vehicle gates. | Literate with knowledge of Konkani language. Persons with experience will be preferred. |
| 2. | 01 Sweeper | cleaning activities such as sweeping, mopping, dusting polishing in classrooms, toilets, washrooms, offices and common rooms etc | Knowledge of Konkani language. Literate with proven experience as a cleaner or housekeeper. People residing in the vicinity of the college will be preferred. |

Quotations should specify the wage rate payable per day. It should also include experience and qualification alongwith the area of speciality.

The quotation for outsourcing the above services, addressed to the Principal, CES College of Arts and Commerce, Cuncolim-Salcete-Goa 403 703, should reach by 27.2.2020 before 2.00 p.m.

Date :18.02.2020
Place : Cuncolim-Goa

Dr. Sanjay P. Sawant Dessai
Principal

THE GOAN EVERYDAY Wed, 19 February 2020
epaper.thegoan.net/c/4915

LOKMAT (Marathi)      Date:23-02-2020        (page 11)

लोकमत

संडे अँकर । आदित्य वाटवे : कुंकळ्ळी महाविद्यालयात शिवजयंती साजरी

# युवकांनी शिवाजी महाराजांच्या चरित्राचा अभ्यास करावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कुंकळ्ळी** : कुंकळ्ळी शिक्षण संस्थेच्या कुंकळ्ळी कला व वाणिज्य महाविद्यालयात प्रथमच शिवजंयती उत्सव साजरा करण्यात आला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून मिरामार येथील धेंपे महाविद्यालयाचे प्राध्यापक आदित्य वाटवे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी वाटवे यांनी शिवाजी महाराजांचा इतिहास व शिवाजी महाराजांनी केलेल्या धाडसी मोहिमांची माहिती विद्यार्थ्यांसमोर कथन केली.

शिवाजी महाराज एक आदर्शवत राजा होते. त्यानी आपल्या रयतेच्या हितासाठी ठोस कायदे केले व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली.



**शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मानवंदना देताना आदित्य वाटवे, डॉ. संजय देसाई, आनंद देसाई व विद्यार्थी.**

महाराजांनी स्वत:च्या ताकदीवर खऱ्या अर्थाने रयतेचे राज्य निर्माण केले. लोकाशाही प्रधान राज्य काय असते याचे उदाहरण महाराजांनी घालून दिले होते.

गड जिंकणे व येणाऱ्या आव्हानांना धाडसाने सामोरे जाणे या गुणांमुळे महाराज जनतेच्या मनामधे कायमचे राहिले. जगात कोणतीही गोष्ट अशक्य नसते. जर आपले मन साफ असले व आपण इतरांच्या भल्यासाठी कार्य करु इच्छितो तर अशक्य कामही शक्य होते हे महाराजांनी सिद्ध करुन दाखविले.

आजच्या युवकांनी महाराजांच्या चरित्राचा अभ्यास करावा व त्यांच्या गुणाचा स्वीकार करावा, असे आवाहन वाटवे यांनी या वेळी बोलताना केले.


**SHREE SHIDHNATH SAUNSTAN VILLIAN BHATI, SANGUEM GOA**

**CUPAN NIKHAL**

Date : 21/02/2020

| | |
|---|---|
| **PRIZES** | |
| 1) | 1786 |
| 2) | 1337 |
| 3) | 1144 |
| **CONSOLATION PRIZES** | |
| 1) | 1693 |
| 2) | 1914 |
| 3) | 1105 |
| 4) | 1027 |
| 5) | 1229 |

LOKMAT (Marathi)      Date:25-02-2020(page 06)

लोकमत

# कुंकळ्ळी उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कुंकळ्ळी** : कुंकळ्ळी शिक्षण संस्थेच्या कुंकळ्ळी उच्च माध्यमिक विद्यालयाने कुंकळ्ळी शाळा समूहाच्या शिक्षकांसाठी 'इन्वेंट अँड्रॉइड ॲप्स युजिंग एमआयटीएस ॲप इन्वेंटर' या विषयावर खास कार्यशाळेचे आयोजन केले होते. गिवा आभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सहयोगाने ही कार्यशाळा झाली.

या कार्यशाळेचे उद्‌घाटन शिक्षण खात्याचे उपसंचालक डॉ. उदय गावकर यांच्या हस्ते झाले. या वेळी गोवा आभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य कृपाशंकर एम. एस., कुंकळ्ळी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दिलीप देसाई, कुंकळ्ळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय देसाई, नीलेश फळ देसाई, प्राचार्य टिलरॉय फर्नांडिस, सोनिया उसगावकर व दत्तराज फळ देसाई उपस्थित होते.

दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेत शिक्षकांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाचे धडे कसे द्यावेत व या तंत्रज्ञानाचे फायदे काय याचेही प्रशिक्षण देण्यात आले. या वेळी डॉ. उदय गावकर यांनी सांगितले, की शिक्षणात तंत्रज्ञानाचा जास्तीतजास्त उपयोग कसा करता येईल व त्यातून विद्यार्थ्यांचा विकास कसा साधता येईल, याबाबत शिक्षकांनी अभ्यास करावा.

Goa Main
Page No. 6 Feb 25, 2020
Powered by: erelego.com